# श्रीमंत मालोजीराजे यांचे सामाजिक व राजकीय कार्य

प्रा.डॉ.एस्.एम्.गावडे इतिहास विभाग प्रमुख,मुधोजी महाविद्यालय, फलटण_ता.फलटण, जि.सातारा

---

**प्रास्ताविक :** महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहु महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, संत गाडगे बाबा, संत तुकडोजी महाराज, या सर्व मान्यवरांच्या नामावलीत फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचा देखीलआवर्जून उल्लेख करावा लागतो. या सर्वांचे पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये फार मोठे योगदान आहे. दिनदुबळ्यांची सेवा करणारे अनिष्ठ रूढींवर प्रहार करून समाज सुधारणेचा प्रयत्न करणारे व लोक कल्याणाचा वसा घेतलेले श्रीमंत मालोजीराजे एक समाजसुधारकच होते. श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या ३०वर्षाच्या कारकिर्दीत फलटण संस्थानातील स्त्रिया दलित व प्रजेच्या हितार्थ अनेक सुधारणा केल्या.

**फलटण संस्थानचा पूर्वइतिहास :** फलटण संस्थान हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि वैभवशाली संस्थान होते. त्याची स्थापना सन १२८४ मध्ये पहिल्या निंबराज(परमार) याने केली. सन १२८४ ते १९४८ पर्यंत हे संस्थान अनेक राजकीय चढउतार व स्थित्यंतरे यातून गेले. एकंदर २५ राज्यकर्ते या फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यात होऊन गेले. याच संस्थानचे २५ वे व शेवटचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे यांची कारकिर्द अतिशय महत्त्वाची मानली जाते. त्यांनी सन १९१७ ते १९४८ असा प्रदिर्घ काळ राज्यकारभार करून फलटणच्या आधुनिकीकरणाला सुरूवात केली.[१]

**श्रीमंत मालोजीरावांचे राज्यारोहण :** श्रीमंत मुधोजीराव यांचे पुत्र व्यंकटराव उर्फ नाईक साहेब हे सन १८८७ मध्यचे निपुत्रिक मृत्यू पावल्यामुळे श्रीमंत मुधोजीरावांनी रघुनाथराव नाईक निंबाळकर यांचा मधला मुलगा नारायणराव यांना २८ डिसेंबर १८९९ रोजी दत्तक घेवून त्यांचे नाव मालोजीराव असे ठेविले.[२] परंतू लवकरच १७ ऑक्टोबर १९१६ रोजी श्रीमंत मुधोजीराजांचे निधन झाले. श्रीमंत मालोजीराजे अल्पवयीन असल्याने संस्थानचा राज्यकारभार ब्रिटीश सरकारने नेमलेल्या ॲडमिनिस्ट्रेटर मार्फत चालविला. पुढे मालोजीराव २१ वर्षाचे झाल्यानंतर १५ नोव्हेंबर १९१७ रोजी संस्थानचा राज्यकारभार त्यांनी हाती घेतला.

**श्रीमंत मालोजीराजांच्या सामाजिक सुधारणा :** पुरोगामी वृत्तीच्या श्रीमंत मालोजीराजांना तत्कालीन सामाजातील अस्पृश्यता, जातीयता, अज्ञान, अंधश्रध्दा, बालविवाह, पडदा पध्दती या गोष्टी अनिष्ठ वाटल्या आणि अधिकारावर आल्यानंतर त्या दुर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**पडदा पध्दतीचा त्याग :-**उच्चकुलीन मराठा समाजात परंपरेने चालत आलेल्या स्त्रियांच्या बाबतीतील (गोषा) पध्दतीचा त्याग करण्याचा निर्णय राजदांपत्याने घेतला व सौ. लक्ष्मीदेवी राणीसाहेब या श्रीमंत मालोजीराजांबरोबर सार्वजनिक सभा समारंभात ते उघड जाऊ लागल्या म्हणजे साठ वर्षापूर्वी त्यांनी ही पडदा पध्दती मोडली. त्यांचे हे अनुकरण हळूहळू समाजातील इतर स्त्रियाही करू लागल्या.[३]

**पशुहत्यास बंदी:-**श्रीमंत मालोजीराजांनी कारभारत हातात घेतल्यानंतर दुसरी महत्त्वाची सुधारण केली ती म्हणजे परंपरेने राजघराण्यात चालत आलेला प्रघात म्हणजे कुलस्वामीच्या नैवेद्यास बकरे मारण्याची पध्दत बंद केली. याशिवाय फलटण संस्थानातील ८४ गावांमध्ये कोणीही देवदेवीपुढे पाडे, बकरे, मेंढरे वगैरे अनाथ अथवा मुक्या जनावराला बळी देवू नये असा हुकूम त्यांनी काढला.[४] तसेच गोरक्षणाकडे त्यांनी अधिक लक्ष दिले. मांसाहारासाठी होत असलेला प्राणीवध श्रीमंत मालोजीराजांना पसंत नव्हता. त्यामुळे पशुहत्त्या कमी झाली. तसेच फलटण संस्थानातील काही गावात रेडा जत्रेची वहिवाट चालू होती. जत्रेमध्ये देवापुढे रेडा मारण्यात येत असे. हा मारलेला रेडा घेण्याच्या हक्कासंबंधी लोकांमध्ये तंटे होत असत. त्यामुळे सार्वजनिक स्वास्थ्याच्या भंग होण्याचे प्रकार घडत असत. त्यावेळी रेडे जत्रा बंद करण्याचे त्यांनी फर्माण काढले.[५]

**अस्पृश्यतेचे उच्चाटन :-**श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या राज्यरोहणाच्या वेळी आपल्या संस्थानातील श्रीराम मंदिर व अन्य मंदिरात दर्शन घेण्यासाठी हरीजनांना ती खुली करण्यात आली. तसेच जातीभेद न मानणे, स्पृशा-स्पृश्यता न पाळणे, जन्माने कोणी श्रेष्ठ कनिष्ठ नसून सर्व मानव एकच आहेत ही मनाची धारणा श्रीमंत मालोजीराजांनी ठेवली. त्यांच्या राज्यकारभाराचे धोरण जातीविषयक समानतेचे आहे. त्यामुळे सर्व समाजाची सर्वांगिण उन्नती होण्यात व त्यांच्यातील बंधुभाव वाढविण्यास ते अत्यंत पोषक अशी झाली अस्पृश्यता निवारणाची चळवळ ही अलिकडील आहे. परंतू तत्पूर्वीच श्रीमंत मालोजीरावांनी त्या समाजाला अस्पृश्य म्हणून न लेखण्याचे धोरण ठेवले होते.[६]

सन १९२९ मध्ये झालेल्या कायदेमंडळात अस्पृश्यता कमी करण्यासाठी श्री माधव संभाजी अहिवळे यास नेमून अस्पृश्य जातीला स्थान दिले होते. याशिवाय कायदेमंडळातील लोक नियुक्त सदस्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. श्रीमंत मालोजीराजे अस्पृश्यतेबद्दल म्हणतात की, अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे. मनुष्य जातीचा तो उपमर्द आहे. व जगात हिंदुना लज्जेने खाली माना घालावयास लावणारी व राष्ट्रविघातक अशी ती दुष्ट रूढी आहे दक्षिण आफ्रिकेतील लोक हिंदी लोकांना अस्पृश्याप्रमाणे वागवितात व त्याबद्दल तक्रार केली तर आपल्या पायाखाली काय जळते आहे ते आधी पहा असा टोमणा देतात. ही

परिस्थिती पालटण्यासाठी आपण बुध्दीपुर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आपण आपले कर्तव्य न करता अस्पृश्यांना दुसरे समाज हिंदुधर्माशी संबंध तोडण्यास सांगतात म्हणून तक्रार करण्यात काय अर्थ आहे. तेथे कोल्ही, कुत्री, गाढवे ही शिवलेली चालतात त्या पाणवठ्यावर हरीजनांना तेवढा मज्जाव असावा ही किंती अन्यायकारक गोष्ट आहे. मद्रास प्रांतातील एलोर गावी ३० सप्टेंबर १९४४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले भाषण आपण वाचावे अशी विनंती त्यांनी दरबाराला केली. म्हणजे त्या समाजाला त्याविषयी किती तिव्र संताप वाटतो याची आपणाला कल्पना येईल.[७]

**बालविवाह प्रतिबंधककायदा** बालविवाहापासून होणारे दुष्परिणाम टाळावेत व फलटण संस्थानची सामाजिक उन्नती व्हावी या हेतूने हा कायदा १ एप्रिल १९३० रोजी श्रीमंत मालोजीराजांनी संस्थानाला लागू केला. सामाजिक सुधारणा लोकांनीच स्वयंस्फुर्तीने करावी ही गोष्ट खरी पण आपले लोक तितके सुशिक्षित नसल्याने हा कायदा संस्थानला निर्माण करावा लागला. स्त्रियांना सदृढ व सशक्त करणे सध्याच्या स्थितीत जरूर असल्याने या कायद्याची अत्यंत आवश्यकता आहे. या कायद्यानुसार २१ वर्षाहुन कमी वयाचा स्त्री-पुरूष विवाह करेल त्यास ३०० रू. दंड केला जाई. तसेच जो कोणी बालविवाह विधी करतो व जे या विवाहास जबाबदार आहेत त्यांना एक महिना साधी कैद व तीनश रूपये दंड केला जाई. या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित व काटेकोरपणे होते की नाही ही जबाबदारी श्रीमंत सौ. लक्ष्मीबाई राणी साहेबांकडे सोपविली.[८]

**शिशु संगोपन केंद्र** ज्या गरीब लोकांना उद्योग कामामुळे आपल्या अर्भकाची काळजी घेण्यास सवड होत नाही अशा लोकांच्यासाठी फार मोठी सोय होणार होती. म्हणून मुलांची होणारी अनास्था व त्यापासून होणारी मृत्यूसंख्या पाहून शिशुसंगोपन केंद्रे अतिशय आवश्यक आहेत. तसेच या संगोपन केंद्राची लोकांना माहिती व्हावी त्यासाठी संस्थानात शिशु सप्ताह व आरोग्य प्रदर्शन सन १ डिसेंबर ते ४ डिसेंबर १९२९ मध्ये भरविण्यात आले होत

**श्री सगुणामाता सुतिका गृह :-** बाळंतपणाचे प्रसंग प्रत्येक कुटुंबावर येत असतात. त्यामध्ये स्त्रियांचे हाल होतात. सदर प्रसंगी मदत करण्यात शास्त्रीय पध्दतीने शिकुन तयार झालेल्या सुईणीची किती जरूरी असते. बाळंतपणात काही स्त्रिया मृत्यूही पावल्या होत्या. याची माहिती श्रीमंत सौ. लक्ष्मीदेवी राणीसाहेब यांना समजल्यानंतर त्यांनी फलटण येथे संस्थानातील सर्व जातीच्या स्त्रियांकरीता सगुणामाता सुतिकागृहाची स्थापना केली. श्रीमंत मालोजीराजांच्या हस्ते १९ सप्टेंबर १९२८ ते सुरू केले.[१०] याचा फायदा आजही फलटण तालुक्यातील गरजू व गरीब स्त्रियांना होत आहे.

**मोफत शिक्षण:-**श्रीमंत सौ. लक्ष्मीदेवी राणीसाहेब म्हणत की, स्त्रियांना पुरूषांशी समता न मिळण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे आर्थिक परावलंबन हे होय. व त्या परावलंबाचे खरे कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव हे होय. म्हणून शिक्षणाचे ध्येय नुसते नैतिक अगर सांस्कृतिक असता उपयोगी नाही. व्यवहारात ते शिक्षण स्त्रियांना अर्थलाभ करून देण्यास ते समर्थ असले पाहिजे. म्हणून स्त्रियांनी फोटोग्राफी, टायपिंग, डेअरी, पोल्ट्री, भाजी-पाल्याची शेती, छपाई, बुक बाईडिंग, खेळणी तयार करणे त्या गोष्टी त्यांना सहज साधण्याजोग्या आहेत. [११] म्हणून श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या संस्थानात मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत देण्याची व्यवस्था केली.

**श्रीमंत मालोजीराजांचे राजकीय कार्य-** श्रीमंत मालोजीराजे म्हणत की, राजकीय सुधारणा पचविण्याकरीता सामाजिक सुधारणाही फार आवश्यक असतात. म्हणून श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या राजकीय जीवनात सतत उदारमतवादी आणि लोकशाहीवादी विचार प्रणालीचा अवलंब केला.

**मिश्र सल्लागार मंड** श्रीमंत मालोजीराजांनी संस्थानची राजसुत्रे हाती घेतल्यानंतर लवकरच राज्यकारभाराच्या कामी आम्हास सुचना मिळाव्यात म्हणून सन १९२० मध्ये अधिकारी व प्रजेतील पुढारी यांचे एक मिश्र सल्लागार मंडळ स्थापन केले होते. त्यामुळे प्रजेच्या आकांक्षा तृप्त होण्यास सरळ व सनदशिर मार्ग त्यांनी उपलब्ध करून दिला.[१२] या पाठीमागे संस्थानचा राज्यकारभार लोकमतानुवर्ती व लोक प्रतिनिधीस जबाबदार असा करणे हेच आपल्या राज्यकारभारातले अंतिम ध्येय आहे. असे त्यांचे मत होते. कोणाही प्रजाजनाना योग्य कामाकरीता श्रीमंत मालोजीरावांना भेटण्यास कधीही बंदी नसे. त्यांच्याकडे केलेल्या अर्जाची ताबडतोब चौकशी करून योग्य न्याय लवकर मिळाल्याबद्दल श्रीमंत मालोजीरावांचा फार कटाक्ष होता.[१३]

**कायदेमंडळाची स्थापना (१९२९)** श्रीमंत मालोजीराजे हे हुकूमशाही वृत्तीने वागणारे संस्थानिक नसून लोकशाही मार्गाने वागणारे संस्थानिक होते. दि.१७ सप्टेंबर १९२८ रोजी श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या ३२ व्या वाढदिवसाच्या दिवशी एक जाहीरनामा प्रसिध्द करून संस्थानचा राज्यकारभार लोकमतानुवर्ती व लोकप्रतिनिधीस जबाबदार करणे हे आमच्या राज्यकारभाराचे अंतिम ध्येय आहे हे जाहीर केले. व त्यानुसार ७ सप्टेंबर १९२९ रोजी श्रीमंत मालोजीरावांनी संस्थानच्या राज्यकारभाराचा कायदा जारी करून संस्थानात कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांची स्थापना केली. कायदेमंडळाच्या उद्घाटन प्रसंगी श्रीमंत मालोजीरावांनी आपल्या भाषणात "अनियंत्रित अगर एकसत्ताक राज्यपध्दती मग ती कितीही जनहितकारी असो तिचे युग आता संपले आहे." असे उद्गार काढले आहे. नवीन कायदेमंडळात १७ सभासद असून त्यापैकी ८सभासद लोकनियुक्त तर ९ सभासद हे दरबार नियुक्त होते. त्यापैकी एकाला कायदेमंडळाचे अध्यक्ष नेमण्यात आले. तसेच हरीजनांपैकी श्री.माधव संभाजी अहिवळे यांना कायदेमंडळाचे सभासद नेमण्यात

आले. श्रीमंत मालोजीराजांच्या या सुधारणेबद्दल प्रजेने त्यांना २७ सप्टेंबर १९२९ रोजी मानपत्र दिले.[१४] पुढे श्रीमंत मालोजीरावांनी स्त्रियांना राजकीय हक्क प्राप्त होण्यासाठी त्यांना कायदेमंडळात बसण्याचा व सभासद होण्याचा हक्क देण्यात आला. त्यानुसार श्री.सौ.आनंदीबाई शिर्के यांना कायदेमंडळात घेण्यात आले. त्यांचे स्त्रीउन्नतीचे कार्य फार मोठे होते.[१५]

**समारोप :-**

वरीलप्रमाणे श्रीमंत मालोजीरावांनी आपल्या कारकिर्दीत सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करून फलटण संस्थानात आधुनिक युगाचा प्रारंभ केला. त्यांच्या या कार्यामुळे स्त्रीया, अस्पृश्य लोक व रयतेच्या हितासाठी अनेक सुधारणा घडून आल्या. म्हणून पुरोगामी महाराष्ट्रातील श्रीमंत मालोजीराजे एक समाजसुधारकच होते असे म्हटले जाते.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


१. फलटण दरबार आज्ञापत्रिका १५ जून १९३९ पृ.५
२. फलटण संस्थानची वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १९०५ -०६ पृ.२
३. रा.ब.भगत स्मरणिका १९८३ श्रीमंत मालोजीराव राजेसाहेब पुतळा स्मारक समिती फलटण पृ.२७
४. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० जुलै १९२५ पृ.२
५. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० जुलै १९२६ पृ.७
६. फलटण दरबार आज्ञापत्रिका १५ डिसेबर १९३६ पृ.७
७. फलटण दरबार आज्ञापत्रिका १५ ऑक्टो.१९४४ पृ.२५
८. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० एप्रिल १९३० पृ.१४४
९. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० जानेवारी १९३० पृ.८२
१०. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० ऑक्टोबर १९२८ पृ.४५
११. फलटण दरबार आज्ञापत्रिका १५ डिसेंबर १९४५ पृ.५
१२. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० ऑक्टोबर १९२८ पृ.३९
१३. बाळासाहेब पाटीलः दक्षिण संस्थानावरील खास अंक. सत्यवादी, जून १९४०, पृ.१२९.
१४. कित्ता पृ.१३२
१५. फलटण दरबार आज्ञापत्रिका १५ ऑक्टोबर १९४४, पृ.१८.